**दि.कि.अर्ज क्र.४०३/२०२५**
**भिमाबाई दातीर + ४ वि. कोणी नाही.**

**<u>६ वे दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, पिंपरी, जिल्हा पुणे यांचे न्यायालयात</u>**

**१ श्रीमती भिमाबाई पांडुरंग दातीर**
वय –८० वर्षे, धंदा –काही नाही ,
रा. फलॅट सनं. २, विंग – ए, माउली कृपा,
इंद्रप्रस्थ सोसायटी, क्रांती नगर, माउली कृपा,
पुणे– ४११०३५.

**२. श्री. अजित पांडुरंग दातीर**
वय –५७ वर्षे, धंदा –शेती व व्यापार ,
रा. दातीर चाळ, नवनाथ चौक,
हनुमान मंदीर जवळ, आकुर्डीगाव,
पुणे– ४११०३५

**३. श्री. सतीश पांडुरंग दातीर**
वय –५३ वर्षे, धंदा –शेती व व्यापार ,
रा. फलॅट सनं. २, विंग – ए, माउली कृपा,
इंद्रप्रस्थ सोसायटी, क्रांती नगर, माउली कृपा,
पुणे– ४११०३५.

**४. सौ. मंदाकिनी श्रीराम नखाते (लग्नानंतरचे नाव)**
**कु. मंदाकिनी पांडुरंग दातीर (लग्नापुर्वीचे नाव)**
वय –६० वर्षे, धंदा –गृहिणी,
रा. आकुर्डी, पुणे– ४११०३५

**५.** श्रीमती सुनंदा दत्तात्रय काळे **(लग्नानंतरचे नाव)**
**कु. सुनंदा पांडुरंग दातीर (लग्नापुर्वीचे नाव) ...**
वय –५८ वर्षे, धंदा –गृहिणी,
रा. दातीर चाळ, नवनाथ चौक,

हनुमान मंदीर जवळ, आकुर्डीगाव,
पुणे– ४११०३५ ... **अर्जदार**

**––विरुध्द––**

कोणी नाही. **... जाबदेणार**

**<u>अर्जदारांतर्फे सुविद्य विधीज्ञ :डी.बी.इंगळे</u>**

**<u>निशानी क्रमांक १ खालील आदेश</u>**

**(दिनांक १३ मार्च२०२६ रोजी पारीत)**

सदरचा अर्ज यातील अर्जदार क्र.१ ते ५ यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ प्रमाणे वारस दाखला मिळणेबाबत दाखल केलेला आहे.

**०२.** अर्जदार क्र.१ ते ५ यांनी त्यांचे अर्जात शपथेवर कथन केले आहे की, अर्जदार क्र.१ ते ५ हे मयत **पांडुरंग मारुती दातीर** यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. तसेच अर्जदार क्र.१ ते ५ यांनी शपथेवर कथन केले की, अर्जदार क्र. १ ही मयत **पांडुरंग मारुती दातीर** यांची पत्नी आहे व अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे मुले व अर्जदार क्र. ३ व ४ हे मयताची मुली आहेत. मयत **पांडुरंग मारुती दातीर** हे दि. १९/०२/२००२ रोजी आकुर्डी मारुती निवास क्रांतीनगर येथे मयत झाले आहेत. त्यामुळे अर्जदार क्र.१ ते ५ हे मयत **पांडुरंग मारुती दातीर** यांचे वारस असल्याबाबत सदरचा अर्ज वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केला आहे. मयत पांडुरंग मारुती दातीर यांच्या आई रेउबाई मारुती दातीर व वडील मारुती खंडू दातीर यांचे देखील निधन झालेले आहे.

**०३.** सदर अर्जदार क्र.१ ते ५ यांच्या शिवाय मयत **पांडुरंग मारुती दातीर** यांचे अन्य इतर कोणी वारस आहे अगर कसे याबाबत इंडेक्स टायटल नंबर १० वर जाहीरनामा–बेलीफ रिपोर्ट अर्जदाराचे घराच्या दर्शणी भागास दरवाज्याजवळ

उदघोषणा नोटीस डकविण्यात आली. तसेच जाहीर नोटीस इंडेक्स टायटल नंबर २०६ वर स्थानिक दैनिक वृत्तपत्र पुण्यनगरी यामध्ये दि. २५.११.२०२५ रोजी प्रकाशीत करण्यात आली. जाहीर नोटीस स्थानिक दैनिक वृत्तपत्र व जाहीरनाम्याचे अनुषंगाने अर्जदाराच्या अर्जावर आक्षेप मागविण्यात आले.

**०४.** अर्जदार क्र.१ ते ३ यांनी **नि.क्र.१** वर दाखल केलेल्या अर्जाशी सुसंगत अशा मजकुराचे सरतपासनीचे पुराव्याचे शपथपत्र इंडेक्स टायटल नंबर २१६ वर दाखल करून न्यायालयासमोर शपथेवर पुरावा दिला की, मयत **पांडुरंग मारुती दातीर** हे दि. १९/०२/२००२ रोजी आकुर्डी मारुती निवास क्रांतीनगर येथे मयत झाले आहेत.

**०५.** अर्जदार क्र.१ ते ४ यांनी मयत **पांडुरंग मारुती दातीर** यांचे मृत्युबाबत पिंपरी महानगरपालिका, पुणे यांनी दिलेले मृत्यु प्रमाणपत्र दि. २८.०१.२०२६ च्या यादीसोबत अभिलेखावर दाखल केले आहे. त्यामुळे अर्जदार क्र.१ ते ५ हे मयत **पांडुरंग मारुती दातीर** यांचे एकमेव कायदेशीर वारस आहेत. त्यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही जवळचे कायदेशीर वारस नाहीत. पुण्यनगरी जाहिर नोटिस पुराव्या दरम्यान देण्यात आली. तसेच अर्जदार क्र.१ ते ५ यांनी इंडेक्स टायटल नं. २१६ रोजी पुरावा बंद पुरसीस दाखल केली आहे.

**०६.** अर्जदार क्र.३ यांचा न्यायालयासमोरील शपथेवरील पुरावा, जाहिरनामा, दैनिक वृत्तपत्रातील जाहीर नोटीस इंडेक्स टायटल नंबर २०६ तसेच जाहीरनाम्यानंतर प्रस्तुत अर्जाला कोणीही न्यायालयासमोर हजर होवून अर्जदार क्र.१ ते ५ हे मयत **पांडुरंग मारुती दातीर** यांचे कायदेशीर वारस नाहीत असा आक्षेप घेतला नाही. या सर्व बाबी लक्षात घेता अर्ज नाकारण्यास कोणतेही सबळ

कारण दिसुन येत नाही. त्यामुळे अर्जदार क्र.१ ते ५ हे मयत **पांडुरंग मारुती दातीर** यांचे कायदेशीर वारस असल्यामुळे त्यांना वारस दाखला देण्यात येतो. या सर्व बाबी लक्षात घेता केवळ अर्जदार क्र. १ ते ५ हे मयत **पांडुरंग मारुती दातीर** यांचे केवळ औपचारीक वारस आहेत ही बाब दिसुन येत आहे. त्यामुळे अर्जदारांनी प्रकरणात दाखल केलेली इंडेक्स टायटल नं. २१६ वरील पुरशिस गृहित धरुन अर्जदार हे मयताचे केवळ औपचारीक वारस असले बाबत खालील प्रमाणे आदेश करीत आहे

## <u>आदेश</u>

**अ.** अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

**ब.** अर्जदार क्र.१ श्रीमती भिमाबाई पांडुरंग दातीर , अर्जदार क्र. २ श्री. अजित पांडुरंग दातीर , अर्जदार क्र. ३ श्री. सतीश पांडुरंग दातीर , अर्जदार क्र. ४ सौ. मंदाकिनी श्रीराम नखाते (लग्नानंतरचे नाव) कु. मंदाकिनी पांडुरंग दातीर (लग्नापुर्वीचे नाव) व अर्जदार क्र. ५ श्रीमती सुनंदा दत्तात्रय काळे (लग्नानंतरचे नाव) कु. सुनंदा पांडुरंग दातीर (लग्नापुर्वीचे नाव) हे मयत **पांडुरंग मारुती दातीर** यांचे केवळ औपचारीक वारस आहेत.

**क.** यातील अर्जदार क्र.१ ते ५ यांनी योग्य तो न्यायालयीन मुद्रांक अदा करावा.

**ड.** सदरचा आदेश हा खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.

WAGHMARE KUNAL KUMAR

Digitally signed by WAGHMARE KUNAL KUMAR
Date: 2026.03.16 17:49:55 +0530

ठिकाण :–पिंपरी.
दिनांक :१३/०३/२०२६

(के.के.वाघमारे)
६ वे दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
पिंपरी, जि. पुणे.